महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४८२ दिनांक ०९ / ०५ / २०१४

विषय : म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना ०१ जानेवारी २०१४ पासून सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबत.

वाचा : १) स.सा.आ.क्र. ११७ (क) दिनांक ३१.०३.१९८६
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.४७१ दिनांक १०.१०.२०१३

......

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला जातो.

२. आता वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र.मभवा-१११४/प्र.क्र.१२/सेवा-९ दिनांक ०७.०५.२०१४ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना दि.०१.०१.२०१४ पासून सुधारित वेतन संरचनेतील मुळ वेतनावरील (वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय असलेला महागाई भत्त्याचा दर ९०% वरून १००% केला आहे. तसेच दि.०१.०५.२०१४ पासून सदर महागाई भत्त्याची रक्कम अदा करण्यात यावी व दि.०१.०१.२०१४ ते ३०.०४.२०१४ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील असेही आदेश पारीत केलेले आहेत.

३. आता शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांचे मुळ वेतनावर ९०% ऐवजी १००% अशा सुधारित दराने दिनांक ०१.०१.२०१४ पासून महागाई भत्ता देण्याबाबत संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी प्रदान केली आहे. तसेच सुधारित दरानुसार महागाई भत्त्याची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे **मे २०१४** पासूनच्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात यावी.

४. त्याचप्रमाणे सुधारित दराने द्यावयाच्या दिनांक ०१.०१.२०१४ ते दिनांक ३०.०४.२०१४ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\D.A-Adm.Circular*